**जिल्हा परिषद, गडचिरोली**
**सामान्य प्रशासन विभाग**
दुरध्वनी क्र: ०७१३२-२९७४६३ Email :- zpgadmail@gmail.com

क्रमांक/जिपग/साप्रवि/स्था-१(ब)/अनुकंपा/ ६८४ /२०२५ दिनांक :- २२/०४/२०२५

# प्रेस नोट

जिल्हा परिषद, गडचिरोली अंतर्गत गट-क व गट-ड मधील रिक्त असलेले विविध संवर्गाची पदे अनुकंपाधारकामधून भरावयाच्या आहेत. त्याअनुषंगाने जिल्हा परिषद, गडचिरोली सन २०२४ व दिनांक ०१.०१.२०२५ रोजी पूर्ण झालेल्या अनुकंपा प्रकरणाची तपासणी करून पूर्ण माहिती असलेल्या एकूण २२४ उमेदवारांची अंतिम जेष्ठता सुची तयार करून जिल्हा परिषद, गडचिरोलीच्या https://zpgadchiroli.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर तसेच जिल्हा परिषद व पंचायत समितीचे फलकावर प्रकाशित करण्यात आलेली होती. अनुकंपाधारकांना याव्दारे आवाहन करण्यात येते की, अनुकंपा तत्वावर नियुक्ती संबंधाने आवश्यक शैक्षणिक दस्तऐवजाची **दिनांक २९.०४.२०२५ व ३०.०४.२०२५ रोजी ठिक सकाळी ११.०० वाजता** पासून पडताळणी करण्यात येणार आहे. तरी **प्रकरण पुर्ण असलेल्या वर्ग-३ च्या पदासाठी पात्र असलेल्या अनुकंपाधारक प्रतिक्षाधिन सूचीतील अनुक्रमांक ०१ ते ११२ पर्यंतच्या उमेदवारांनी दिनांक २९.०४.२०२५ व अनुक्रमांक ११३ ते २१७ पर्यंत व वर्ग-४ च्या पदासाठी पात्र ७ उमेदवारांनी दिनांक ३०.०४.२०२५ रोजी मुळ दस्ताऐवजांच्या छायांकित प्रतीच्या संचासह विर बाबुराव शेडमाके सभागृह, जिल्हा परिषद, गडचिरोली येथे उपस्थित रहावे.**

प्रतिक्षाधिन सूचीतील अनुकंपाधारकांना केवळ दस्तऐवज पडताळणीच्या प्रक्रियेकरीता बोलविण्यात येत असल्याने उमेदवारांना नेमणूकीकरीता हक्क प्रस्तावित करता येणार नाही. तसेच अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती देण्याची प्रक्रिया वेगळयाने पारदर्शकता ठेवून राबविण्यात येईल. त्यामुळे उमेदवारांनी कोणत्याही आमीषाला / भूलथापांना बळी पडू नये असे आवाहन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली यांनी केले आहे.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, गडचिरोली

**(शेखर मा.शेलार)**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी(सा.प्र.)**
**जिल्हा परिषद, गडचिरोली**